**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६९ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २२५** **दिनांक — ११/११/२०२५**

**विभाग — प्रकल्प विभाग**

---

प्रस्तावाचा विषय — अहिल्यानगर महानगरपालिका सावेडी स.नं. २८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियान ( नागरी ) अंतर्गत बांधकाम व पाडकाम C&D Waste कच-यावर प्रक्रिया करण्याच्या प्रकल्प चालविणे व देखभाल दुरूस्ती बाबत फेरनिविदा मागविणेबाबत.

- -**--

**ठराव** — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सावेडी स. नं २८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम C & D Waste कच-यावर प्रक्रिया करण्याच्या प्रकल्प चालविणे व देखभाल दुरूस्ती बाबत खाजगी एजन्सीची नियुक्ती करणेसाठी Expression of Interest ३ वेळेस मागविण्यात आले होते.

सदरचा प्रकल्प हा वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाचा असल्यामुळे व त्यास C & D Waste Processing कामाचा अनुभव आवश्यक असलेबाबत निविदेमध्ये नमूद करण्यात आले होते. सदर ई -निविदेस एकाही एजन्सीचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेसमावेत झालेल्या चर्चेनुसार सदर प्रकल्पासाठी पात्रता निकष शिथिल करणेबाबत निर्णय घेण्यात आला. याबाबत पुर्वीच्या अटी-शर्ती मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आले आहेत,

१) अनुभवाबाबत पात्रता निकष

**मूळ** - मूळ निविदेमध्ये (EOI) C & D Waste Processing बाबत खालीलप्रमाणे नमुद आहे. For qualifying under this category, the bidder (or any member of consortium in case of consortium) shall have experience in carrying out similar work in the last three years as per below.

One similar work of yearly capacity 9000 MT with continious operation
for 1 year from commercial operations date (COD)
OR
Two similar work of yearly capacity 4500 MT with continious operation
for 1 year from commercial operations date (COD)
OR
Three similar work of yearly capacity 3000 MT with continious operation
for 1 year from commercial operations date (COD)

Similar types of work The work related to construction, operation and maintenance of processing and disposal plant of construction and Demolition Waste

Certificate of Experience of similar type of work with signature of Executive Engineer or above - For Government/ Semi government

सुधारित - नवीन पात्रता निकषांनुसार पात्र निविदाकाराकडेस खालीलप्रमाणे यंत्रसामुग्री स्वतःच्यानावावर असणे बंधनकारक आहे.

| Sr.No | Type of Machinery | Numbers |
|---|---|---|
| 1 | Pokelane Machine | 1 |
| 2 | JCB Machine | 1 |
| 3 | Tractor | 2 |
| 4 | Dumper | 2 |
| 5 | Concreate Mixer | 1 |
| 6 | Water Tanker | Capacity 10000 |
| 7 | Concreate Breaker | 1 |

२) वार्षिक उलाढालीबाबत पात्रता निकष

मूळ - मूळ निविदेमध्ये निविदाकाराची मागील ३ वर्षाची वार्षिक उलाढाल १.०० कोटी इतकी असणे बंधनकारक आहे.

सुधारीत - नवीन पात्रता निकषांनुसार निविदाकाराची मागील ३ वर्षाची वार्षिक सरासरी उलाढाल रू.५०.०० लक्ष इतकी असणे बंधनकारक आहे.

३) कामाचा कालावधी

मूळ - कामाचा कालावधी मूळ निविदेमध्ये ३ वर्ष

सुधारीत - सुधारित निविदेमध्ये कामाचा कालावधी ३ वर्ष व काम समाधानकारक असल्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेवून पुढील २ वर्ष मुदतवाढ देण्यात येईल.

४) ठेकेदाराचे उत्पन्नाचे स्त्रोत

मूळ - निविदेमध्ये ठेकेदारास Tipping Charges देण्यात येणार होते व C & D Waste प्रक्रियेनंतर तयार झालेले अंतिम उत्पादन हे ठेकेदाराच्या मालकीचे असेल व त्यापोटी सदर ठेकेदार मनपास रॉयल्टी भरणार, असे नमूद होते.

सुधारीत - ठेकेदारास C & D Waste निर्माण होणा-या स्त्रोताच्या (Source of C&D Waste Generation) ठिकाणी जागा मालकाकडून C & D Waste प्रति ब्रास रू. १०००/- व C & D Waste स्त्रोताच्या ठिकाणापासून सावेडी स.नं २८९ C & D Waste Processing Plant च्या ठिकाणापर्यंत प्रति किलोमीटर रू. २५.०० या दराने संबंधित कचरा निर्मात्यास मनपाने नियुक्त केलेल्या ठेकेदारास रक्कम अदा करावी लागेल असे नमूद आहे. तसेच C & D Waste प्रक्रियेनंतर तयार झालेले अंतिम उत्पादन हे ठेकेदाराच्या मालकीचे असेल, परंतु सदरचे उत्पादन हे मनपाच्या निदर्शनास आणून देणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

करीता,

१) EOI क्र. १२१७९०८ रद्द करणेस

२) C & D Waste प्रकल्प चालविणे व देखभाल दुरूस्ती बाबत एजन्सी नियुक्त केल्यानंतर C & D Waste प्रकल्प चालविणे व देखभाल दुरूस्तीचे काम घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत होणेस.

३) सावेडी स.नं २८९ या ठिकाणी C & D Waste प्रक्रिया व विल्हेवाट लावणेकामी EOI मागवून खाजगी एजन्सी नियुक्ती बाबत वरीलप्रमाणे दुरूस्तीसह नव्याने ई- निविदा (EOI) मागविणे बाबत विभागाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी यास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |